जा.क्र.उमाशि-१/पुवि/ऑन.प्रवेश/२०१५-१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : २८.०५.२०१५

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र.

**विषय:- इ.११ वी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०१५-१६**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी महत्वाच्या सूचना**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालये / कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील मराठी व इंग्रजी माध्यमाचे प्रवेश गतवर्षी प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये केंद्रीय प्रवेश समितीमार्फत केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

सदर प्रवेश प्रक्रियेबाबत महत्वाच्या बाबी, प्रक्रियेत केलेले बदल, प्रक्रियेचे वेगवेगळे टप्पे व त्याप्रमाणे नियोजन व प्रत्यक्ष प्रवेश देताना राबविण्याची कार्यपध्दती याबाबत माहिती देण्यासाठी मुख्याध्यापकांची सभा आज आयोजित केली आहे. सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये आपण अत्यंत महत्वाची भूमिका बजावणार आहात. त्याअनुषंगाने काही महत्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे :-

अ. माहिती पुस्तिकेचे वितरण करणे

१. माहिती पुस्तिका वितरण - आपण आपल्या शाळेतून इ. १० वी परीक्षा प्रविष्ट झालेल्या नियमित, पुन:परिक्षार्थी व खाजगी विद्यार्थी संख्येएवढी माहिती पुस्तिकांची मागणी आपल्या विभागासाठी निश्चित केलेल्या शाळेकडे नोंदविल्यानुसार आपण आवश्यक त्या माहिती पुस्तिका शाळेकडून प्राप्त करून घेतलेल्या असतील. ज्या शाळांनी पुस्तिकांची नोंदणी केली नाही किंवा केलेली नोंदणी कमी अधिक प्रमाणात असल्यास तसा तात्काळ बदल करून आपणास आवश्यक असणाऱ्या संख्येएवढीच पुस्तके प्राप्त करून घ्यावीत. अनावश्यक जादा पुस्तके घेऊ नयेत. पुस्तके घेताना लॉगिन आयडी व पासवर्ड सोबत असल्याची खात्री करून पुस्तिका मोजून घ्याव्यात व त्यानुसार पोहोच दयावी.

२. **माहिती पुस्तिकांचे वितरण** - माहिती पुस्तिकांचे वितरण विद्यार्थ्यांसाठी दि.२८.०५.२०१५ पासून करता येईल. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित करावीत. आवश्यकतेपेक्षा जादा पुस्तके शिल्लक राहिल्यास तात्काळ मुख्य केंद्रास कळवून परत करावीत. अन्यथा शिल्लक पुस्तिकांची रक्कम आपणाकडून वसूल केली जाईल.

३. **माहिती पुस्तिका शुल्क** - माहिती पुस्तिकेचे शुल्क रु.१००/- राहील. त्यापेक्षा जादा शुल्क आकारण्यात येऊ नये.

४. **माहिती पुस्तिका विक्रीचा तपशिल** - माहिती पुस्तिका विक्रीचा तपशिल व हिशोब विहित नमून्यामध्ये आपल्या दफ्तरी ठेवावा. प्राप्त झालेल्या पुस्तिका, वितरण केलेल्या पुस्तिका, जमा रक्कम याच्या नोंदी वेळच्या वेळी ठेऊन शिल्लक पुस्तिकांचा तपशिल अद्ययावत ठेवावा.

५. **रकमेचा भरणा करणे** - आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने आपल्या शाळेतील तंत्र सहाय्यक यांच्या मदतीने भरावयाचे आहेत. माहिती पुस्तिकेची किंमत रूपये १००/- असून ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज आपल्या शाळेच्या लॉगिन आयडी वरून भरण्यात येतील अशा विद्यार्थ्यांबाबत रू.१००/- पैकी रू.२०/- प्रतिविद्यार्थी शाळेकडे ठेवून उर्वरित रू.८०/- प्रमाणे केंद्रीय प्रवेश समितीच्या बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे-४ या शाखेतील खाते क्रमांक ६०१६५३०६१८२ च्या 'Std.XI Centralised Admission Committee' या नावे दि.१५.०६.२०१५ रोजी भरावेत व प्राप्त पुस्तिका व भरलेले पैसे यांचा मेळ घालून पैसे भरल्याची पावती पुस्तिका प्राप्त केलेल्या शाळेकडे सादर करावी. (शिल्लक पुस्तिका परत घेतल्या जाणार नाहीत)

**ब. प्रवेश प्रक्रियेबाबत प्रशिक्षण -**

१. आपल्या शाळेतील इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थी व पालक यांना संपूर्ण प्रवेश प्रक्रियेबाबत योग्य व अद्ययावत माहिती व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक या नात्याने आपली राहील.

२. प्रवेश अर्जातील भाग १ (विद्यार्थ्याची वैयक्तिक माहिती) व भाग २ (गुण व पसंतीक्रम) याबाबत आपण अचूक माहिती घ्यावी. संपूर्ण माहिती पुस्तिकेचे वाचन करा. काही शंका असल्यास झोनमधील क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून निरसन करून घ्यावे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महत्वाच्या व ठळक बाबी विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणाव्यात.

३. दि.०१.०६.२०१५ ते दि.०५.०६.२०१५ या दरम्यान विद्यार्थी व पालकांसाठी प्रशिक्षण वर्ग शाळास्तरावर आयोजित करावेत. उद्बोधनासाठी आवश्यकतेनूसार झोन अधिकाऱ्यांची मदत घेता येईल. आवश्यकतेनूसार झोनमधील झोन अधिकारी, सहाय्यक झोन अधिकारी व पर्यवेक्षीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

क. प्रवेश अर्ज भरणेबाबत

१. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक तयार करावे. दि.०१.०६.२०१५ पासून विद्यार्थी प्रवेश अर्जाचा भाग १ वेबसाईटवर भरू शकतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या सुविधांनुसार कोणतेही आरक्षण नसल्यास घरी बसून फॉर्म भरता येईल.

२. प्रवेश अर्ज भरण्यासाठी आपल्या शाळेतील प्रशिक्षित तंत्र सहाय्यकाची नेमणूक करावी. यामध्ये विद्यार्थ्यांनी निवडलेलेच पसंतीक्रम त्यांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार भरावेत.

३. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाचा भाग १ भरताना विद्यार्थ्याने त्याचा बैठक क्रमांक टाकल्यानंतर त्यांची वैयक्तिक माहिती आपोआप येणार आहे. सदर माहिती तपासून घ्यावी व अचूक असल्याची खात्री करावी.

४. प्रवेश अर्जामध्ये भरलेल्या माहितीमध्ये काही बदल करावयाचा असल्यास विद्यार्थी/पालकांचा लेखी अर्ज घ्यावा व कागदपत्रे तपासून केलेल्या बदलाच्या अर्जाची प्रत आपल्या दफ्तरी ठेवावी. विद्यार्थ्यांचा अर्ज घेतल्याशिवाय भरलेल्या प्रवेश अर्जामध्ये कोणताही बदल करू नये.

५. जे विद्यार्थी घटनात्मक व विशेष आरक्षण प्रवेश अर्जात नमूद करत आहेत. अशा विद्यार्थ्यांचे आरक्षणाबाबतची संबंधित कागदपत्रांची पडताळणी करूनच त्यांचा प्रवेश अर्ज 'अपुव्ह' करावा. आवश्यक कागदपत्रांबाबत माहितीपुस्तिकेतील मुद्दा क्र.७ पहावा. आरक्षण असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज आपण 'अपुव्ह' केल्याशिवाय पूर्ण होणार नाहीत. अर्ज 'अपुव्ह' करण्याची जबाबदारी आपली राहील.

६. प्रवेश अर्ज भाग २ (गुण व पसंतीक्रम) विषयी माहिती विद्यार्थ्याने भरावयाची आहे. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे किमान ४० व कमाल ५० पसंतीक्रम भरावयाचे आहेत. कला इंग्जी माध्यमासाठी एकुण ३२ पसंतीक्रम उपलब्ध असल्याने सर्व पसंतीक्रम देणे अनिवार्य राहील. विद्यार्थ्याने शक्यतो एकाच शाळेची निवड करावी. परंतु

विद्यार्थ्याला जास्तीत जास्त दोन शाखांची निवड करता येईल. विद्यार्थ्याने दोन शाखा निवडल्यास सरमिसळ पध्दतीने पसंतीक्रम भरता येतील. त्यामध्ये निवडलेल्या प्रत्येक शाखेचा किमान एक पसंतीक्रम भरणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्याने एका शाखेची दोन माध्यमे निवडल्यास प्रत्येक माध्यमाचा किमान एक पसंतीक्रम भरणे अनिवार्य राहील.

७. विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरताना त्याला मिळालेले गुण, भरावयाच्या महाविद्यालयाचा मागील वर्षाचा कट ऑफ, माध्यम, वैकल्पिक विषय, अनुदानित / विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालय, भरावी लागणारी फी, घरापासूनचे अंतर, येण्याजाण्याची सोय इ. सर्व बाबींचा साकल्याने विचार करावा. याबाबत आपण विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे.

**ड. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतेवेळी घ्यावयाची काळजी -**

१. प्रवेशाच्या तीन फेऱ्या होतील.

२. विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत पहिल्यांदा मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात रू.५०/- प्रवेश शुल्क भरून विहित मुदतीत प्रवेश घेणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत प्रवेश न घेतल्यास सदर विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जाईल. अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची जबाबदारी केंद्रीय प्रवेश समितीची राहणार नाही याची विद्यार्थ्यांना जाणीव करून दयावी.

३. विद्यार्थ्यांचे गुण व त्यांनी दिलेले पसंतीक्रम यानुसार जर काही विद्यार्थ्यांना प्रथम / द्वितीय फेरीत प्रवेश न मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांना तिसऱ्या (अंतिम) फेरीत प्रवेश मिळू शकेल.

४. प्रथम मिळालेला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच 'बेटरमेंट' मिळू शकेल. बेटरमेंट म्हणजे दिलेल्या पसंतीक्रमापैकी पहिल्यांदा प्रवेश मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या वरील कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त जागा व विद्यार्थ्यांचे गुण यानुसार प्रवेशाची संधी मिळणे. बेटरमेंट ही फेरीनिहाय उपलब्ध जागा, विद्यार्थ्यांचे गुण, संवर्ग, पसंतीक्रम यानुसार मिळेल. विद्यार्थ्यांना बेटरमेंटच्या जास्तीत जास्त दोन संधी मिळतील. दुसरी बेटरमेंट मिळण्यासाठी पहिली बेटरमेंट घेणे आवश्यक राहील. बेटरमेंट विद्यार्थ्यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये रिक्त जागा व विद्यार्थ्यांची गुणवत्ता यानुसारच देय राहील. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला बेटरमेंट मिळेलच असे नाही.

**काही महत्वाच्या सूचना -**

१. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील अन्य मंडळाचे विद्यार्थी (उदा.सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, आयबी, एनआयओएस व अन्य राज्य मंडळाचे विद्यार्थी) तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील महाराष्ट्र राज्य मंडळाचे विद्यार्थी यांना पुस्तिकेत दिलेल्या नऊ झोन केंद्रांवर रू.१००/- भरून माहिती पुस्तिका घेता येईल. माहिती पुस्तिका घेताना विद्यार्थ्यांना परिक्षा प्रवेश पत्र (हॉल तिकिट) किंवा इ.१० वीचे गुणपत्रक दाखवावे लागेल.

२. माहिती पुस्तिकांचे वितरण, प्रवेश अर्ज भाग १ भरणे, वैधानिक व विशेष आरक्षण असल्यास प्रवेश अर्ज 'अप्रुव्ह' करण्यासाठी लागणारी माहितीपुस्तिकेतील मुद्दा क्र.७ मधील कागदपत्रे तपासणे, प्रवेश अर्ज भाग २ भरणे तसेच गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर नंतरची प्रक्रिया अशा विविध टप्प्यांवर आपणास मार्गदर्शन करावयाचे आहे.

३. महाराष्ट्र राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर झाल्यानंतर विहित केलेल्या मुदतीत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज पसंतीक्रमासह भरून पूर्ण करावयाचा आहे. त्यानंतरच त्यांना संपूर्ण अर्जाची प्रिंटआऊट मिळू शकेल.

४. कला, विज्ञान व वाणिज्य या शाखांचे इंग्रजी व मराठी माध्यमाचे इ.११ वीचे प्रवेश केंद्रीय पध्दतीने होत आहेत. या प्रक्रियेतून एमसीव्हीसी (किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम), होम सायन्स (गृह विज्ञान), नाईट ज्युनियर कॉलेज (रात्रशाळा), मराठी व इंग्रजी

माध्यमाव्यतिरिक्त अन्य माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयांतील इ.११वीचे प्रवेश होणार नाहीत. सदर प्रवेश संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांच्या स्तरावरून होतील.

५. इनहाऊस, अल्पसंख्यांक व व्यवस्थापन कोटयातील प्रवेश संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरून होतील. परंतु वरील कोटा कनिष्ठ महाविद्यालयांनी / व्यवस्थापनांनी केंद्रीय प्रवेश समितीकडे प्रत्यार्पित केल्यास सदर प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीनेच होतील.

६. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरील महाराष्ट्र राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांनी नऊ झोनपैकी कोणत्याही केंद्रातून माहिती पुस्तिका घेऊन पुस्तिकेत नमूद केलेल्या त्यांना सोयीच्या ठिकाणच्या मार्गदर्शन केंद्राकडून अर्ज 'अपुव्ह' करावा. झोननिहाय मार्गदर्शन केंद्रांची यादी माहितीपुस्तिकेत दिलेली आहे.

७. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील अन्य मंडळाचे विद्यार्थी (उदा. सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसई, आयबी, एनआयओएस व अन्य राज्य मंडळाचे विद्यार्थी) यांनी मराठवाडा महाविद्यालय (एमएमसीसी) डेक्कन जिमखाना, नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय पुणे १ व जयहिंद ज्युनियर कॉलेज पिंपरी या तीन पैकी कोणत्याही केंद्रावरून अर्ज 'अपुव्ह' करावा.

८. प्रवेशासंबंधी www.dydepune.com आणि http://pune.fyjc.org.in ही संकेतस्थळे नियमित पाहावीत.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ तथा
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे